| महाराष्ट्र पोलीस | पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण<br>पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक<br>दुरध्वनी नंबर०२५३.२३०९७००<br>E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |
| --- | --- | --- |

**प्रेस नोट** दिनांक : २६/१०/२०२४

---

# नाशिक जिल्हयातील १११ द्राक्ष शेतक-यांची फसवणुक करुन पसार असलेली महीला आरोपी हिस अटक

परदेशात द्राक्ष एक्सपोर्ट करुन शेतक-याची फसवणुक केले बाबत दशरथ रामचंद्र जाधव वय- ६५ रा. सोनजांब शिवार, ता.दिंडोरी,जि.नाशिक यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार वणी पोलीस ठाणे येथे गु.र.नं.१४६/२०२४ भा.दं.वि कलम ४२०,४०९,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. नमुद गुन्हयातील आरोपीताने संगणमत करुन यातील फिर्यादी व साक्षीदार यांचे शेतातील थॉम्सन प्रजातीचे द्राक्ष खरेदी करुन व्यवहारापोटी झालेले फिर्यादी व साक्षीदार यांचे ५४,८५,१५०/- रु ची फसवणुक केली आहे. तसेच नमुद आरोपीता विरुद्ध नाशिक जिल्हयामध्ये खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

१) वणी पो.स्टे गुरनं. १४६/२४ भादवि ४२०,४०६,३४ प्रमाणे,
२) वणी पो.स्टे गुरनं. २४१/२४ भादवि ४२०,४०६,३४ प्रमाणे,
३) वडनेर भैरव पो.स्टे गुरनं. १३१/२४ भादवि- ४२०,४०६,३४ प्रमाणे,
४) पिंपळगाव बं. पो.स्टे गुरनं. १८१/२४ भादवि - ४२०,४०६,३४ प्रमाणे,
५) लासलगाव पो.स्टे गुरनं. १९२/२४ भादवि- ४२०,४०६,३४ प्रमाणे,
६) दिंडोरी पो.स्टे गुरनं. १९२/२४ भादवि- ४२०,४०६,३४ प्रमाणे

नमुद गुन्हयातील पाहीजे असलेली मुख्य महीला आरोपी नामे- पुर्वा अनिल चव्हाण हि उच्च शिक्षीत असुन गुन्हा घडल्यापासुन देशात व परदेशात आपले अस्तित्व लपवुन वास्तव्य करीत होती.

सदर महीलेच्या शोधार्थ मा.विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे सो,यांचे मार्गदर्शनाखाली मा.पोलीस अधिक्षक विक्रम देशमाने सो, मा.अपर पोलीस अधिक्षक आदित्य मिरखेलकर सो यांनी मा.उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार सुर्यवंशी सो यांचे नेतृत्वाखाली महीला आरोपीच्या शोधार्थ पुणे, ठाणे, बँग्लोर, तामिळनाडु इ. ठिकाणी विवीध तपास पथक पाठवुन सदर महीलेचा शोध घेतला असता सदर महीलेस वणी पोलीस ठाणेचे पथकाने अंत्यत कौशल्याने तीस इंदीरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ दिल्ली येथुन ताब्यात घेवुन अटक करण्यात आली आहे.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा.विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे सो, मा.पोलीस अधिक्षक विक्रम देशमाने सो, मा.अपर पोलीस अधिक्षक आदित्य मिरखेलकर सो, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार सुर्यवंशी सो, मा.पोलीस निरीक्षक सुर्वे सो, स्था.गु.शा यांचे मार्गदर्शनाखाली वणी पोलीस ठाणे सहा.पोलीस निरीक्षक सुनिल पाटील, पोलीस उपनिरीक्षक विजया पवार, पोउनि गणेश कुटे, मपोहवा.११६६ चंद्रभागा कराड, पो.हवा गिलबिले, पो हवा. प्रदीप बहीराम, पो.शि.११५१ एन.जे.तेलंगे, पो.शि.२८३३ किसन चौरे, यांनी मिळुन केली आहे.

तरी नाशिक ग्रामिण पोलिसांतर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारचे व्यापारी , अडत्या, दलाल यांचे अमिषाला बळी पडु नये. अशा प्रकारची द्राक्ष मालाबाबत फसवणुक झाली असल्यास संबंधीत पोलीस ठाणेस तक्रार नोंदवावी.